# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

Date: 02 April 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०२ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यात पोखरण रणक्षेत्रातल्या गोळीबार क्षेत्रात भारतीय वायुसेनेचा सर्वात मोठा युद्ध सराव गगनशक्ती सुरु आहे. कालपासून सुरु असलेला हा युद्ध सराव येत्या १० तारखेपर्यंत चालेल. या युद्धसरावात वायुसेनेची प्रमुख लढाऊ विमानं आणि अत्याधुनिक हेलिकॉप्टर्स आपल्या मारा क्षमतेचं प्रदर्शन करत आहेत.

****

छत्तीसगड इथं सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीत आज चार माओवादी ठार झाले. केंद्रीय राखीव पोलिस दल, कोब्रा बटालियन, जिल्हा राखीव रक्षक आणि विशेष कृतीदल यांनी संयुक्तपणे बिजापूर जिल्ह्यातल्या बस्तर भागात ही कारवाई केली. माओवादी तसंच पोलिसांमध्ये कोर्चोलीच्या जंगलात ही चकमक झाली. पोलिसांनी माओवाद्यांच्या मृतदेहासह एक मशीन गन तसंच इतर स्फोटक साहित्य ताब्यात घेतलं. या परिसरात अजूनही माओवाद्यांचा शोध सुरु आहे.

****

यंदाची अमरनाथ यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रशासनाच्या पूर्वतयारीच्या कामांचा जम्मू-कश्मीर इथं मुख्य सचिव अटल दुल्लू यांनी काल आढावा घेतला. यासंदर्भात आयोजित बैठकीत वरिष्ठ पोलिस अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग, हवामान विभागासह अन्य विभागांचे प्रमुख तसंच श्री अमरनाथजी श्राइन मंडळाचे प्रतिनिधी आणि नागरिक सहभागी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, मुख्य सचिवांनी यात्रेकरुंसाठी तंबू, तसंच लंगरसाठी सुरक्षित स्थळं निश्चित करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. तर यात्रेकरुंसाठी अनेक नि:शुल्क सेवांसह हवामान विभाग, आरोग्य विभाग, जलशक्ती विभाग तसंच परिवहन विभागाच्या सुविधांचाही त्यांनी आढावा घेतला.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राजस्थानच्या जयपूर ग्रामीण लोकसभा निवडणुकीसाठी कोटपुतली इथं जाहीर सभेला संबोधित करतील. दुपारी सुमारे दीड वाजेच्या सुमारास मोलाहेडा गावात ते सभास्थळी पोहोचतील. जयपूर ग्रामीण लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाचे उमेदवार राव राजेंद्र सिंह यांच्या प्रचारासाठी ही सभा आयोजित करण्यात आली आहे. राजस्थानमध्ये २ टप्प्यात १९ आणि २६ एप्रिल या तारखांना मतदान होणार आहे.

****

गेल्या मार्च महिन्यात ११ पूर्णांक ५ टक्के वार्षिक वाढीसह १ पूर्णांक ७८ लाख कोटी रुपये इतका वस्तू आणि सेवा कर महसूल जमा झाला. आतापर्यंतचं हे दुसऱ्या सर्वोच्च क्रमांकाचं महसूल संकलन ठरलं आहे. देशांतर्गत व्यवहारांमधून वस्तू आणि सेवा कर संकलनात १७ पूर्णांक ६ टक्के इतकी लक्षणीय वाढ झाल्यामुळं हे विक्रमी संकलन झालं आहे. मार्चमध्ये परतावा दिल्यानंतर निव्वळ जीएसटी महसूल १ पूर्णांक ६५ लाख कोटी रुपये इतका असून तो मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १८ पूर्णांक ४ टक्क्यांनी वाढलेला आहे.

****

राज्यातल्या २ कोटी १२ लाख ५५ हजार ३५ शालेय विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक असलेल्या आधार प्रमाणीकरणासाठी ३० मार्च ही अंतिम मुदत देण्यात आली होती. प्रत्यक्षात १ कोटी ९४ लाख ६९ हजार २१५ विद्यार्थ्यांचेच आधार वैध ठरले. तर ५ लाख १७ हजार २३२ विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांकच शिक्षण विभागाला उपलब्ध करून दिला नाही. त्यामुळं नव्या सत्रातील गणवेशासह शालेय पोषण आहाराच्या निधीला कात्री लागून लाखो विद्यार्थ्यांना या दोन्ही लाभांपासून वंचित राहावं लागण्याची शक्यता आहे. याची गंभीर दखल घेत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना गणवेश योजनेपासून वंचित ठेऊ नये असे निर्देश शिक्षण विभागाला दिले आहेत.

****

लातूर जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी भरारी पथकांसह इतर सर्व संबंधित पथकांनी समन्वयानं काम करावं तसंच तालुकास्तरीय नोडल अधिकाऱ्यांनी सर्व संबंधित पथकांच्या दैनंदिन कार्यवाहीचा आढावा घ्यावा, अशा सूचना लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हास्तरीय आदर्श

आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी अनमोल सागर यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात आयोजित बैठकीत काल ते बोलत होते.

****

येत्या २४ तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. बीड, अकोला, जळगाव, सोलापूर, चंद्रपूर इथं तापमानानं चाळिशी पार केली आहे. तर मालेगाव, अमरावती, वाशिम, यवतमाळ या शहरातही पारा चाळीस अंशाच्या जवळ पोहोचला आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं ३८ पूर्णांक ४ अंश सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद झाली आहे.

****